नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ६**
**ऑगस्ट २००८**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि.१८ ऑगस्ट २००८** या दिवशी **दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल. सदर सभेत खलील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

विषय क्र. १३८

संदर्भ :– १) ॲड्.उदय प्रकाश वारुंजीकर यांच्या दि. १५/३/२००८ च्या नोटीसा.
२) मा.संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. वियो–पुणे/आ.क्र. २४/खेळाचे मैदान/कलम १२७/ख.सू./टी.पी.व्ही.–१/७७० दि. २९/४/२००८ चे पत्र.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/३०७ दि. २०/६/२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ५१४, दि. १/७/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

ॲड्.उदय प्रकाश वारुंजीकर यांची नोटीस आणि मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने मान्य विकास योजना आराखडा सन १९८७ मधील प्राथमिक शाळा + क्रिडांगण (पीएस+पीजी २४) साठी आरक्षित आणि डी.पी.रस्त्यात बाधीत पुणे, पेठ नाना, सि.स.नं. ५९५, ५९६/अ, ५९८, ६०३, ६०० या मिळकतींची कलम १२६ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र. १३९

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/३११ दि. २५/६/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५१६, दि. १/७/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

ब्ल्यु क्रॉस सोसायटी ऑफ पुणे या संस्थेकडून भटक्या कुत्र्यांवर नसबंदीची शस्त्रक्रिया करणेप्रकरणी खालील बाबींना मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) ब्ल्यु क्रॉस सोसायटी ऑफ पुणे यांचेकडून भटक्या कुत्र्यांवर लॅप्रोस्कोपी पध्दतीने नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेण्यास, त्याक१३९रीता सदर संस्थेशी करारनामा करणेस व सदर कराराच्या अटी मा.महा.आयुक्त यांनी निश्चित करण्यास

२) सदर योजनेसाठी लागणारा निधी अंदाजे रुपये २० लाख आरई१९अे–११०, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे, ९–पथांची झाडलोट, कचरा वाहतुक नि मैला व मैलापाणी वाहतूक व्यवस्था (आ.प्र.) (९) आरोग्य विभागातील कचऱ्या संदर्भातील कामे आऊट सोर्सिंगने करुन घेणे या अर्थशिर्षकावरुन आरई१५डी–१०१, ५.लोकारोग्य, १–मुख्य देखरेख व इतर, ज–उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त व पारितोषिके देणे (आ.प्र.) या अर्थशिर्षकावर वर्गीकरणाने उपलब्ध करुन घेण्यास

३) सदर शस्त्रक्रियेकरीता होणाऱ्या खर्चाची रक्कम आरई१५डी–१०१, ५.लोकारोग्य, १–मुख्य देखरेख व इतर, ज–उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त व पारितोषिके देणे (आ.प्र.) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकून ब्ल्यु क्रॉस सोसायटी ऑफ पुणे यांना आदा करणेस

४) प्रत्येक नसबंदी शस्त्रक्रियेमागे र.रुपये ३७५/– आदा करणेस

UnRegistered

**विषय क्र. १४०**

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब कापरे व मा.शैलेश चरवड यांचे दि. १/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३२, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी स.नं. ५ येथे सांस्कृतिक हॉलच्या वरती व्यायामशाळा बांधणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. २००, अ.क्र. ५१, शहरातील विविध क्रिडांगणांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र. एस-२८) पान क्र. २९५, अ.क्र. २८, स.नं. ९ सनसिटी, ॲमिनिटी १२ गुंठे स्पेसवर स्केटींग रिंग करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी स.नं. ५ येथे सांस्कृतिक हॉलच्या वरती व्यायामशाळा बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १४१**

संदर्भ :- १) मा.श्रीमती इंदुमती फुलावरे यांचे दि. १/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३३, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४७ विविध ठिकाणी डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी र.रुपये १२.७५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे, (यादी ए-२), पान क्र. २४५, अ.क्र. ६६, रास्ता पेठ पॉवर हाऊस ते अपोलो टॉकीज रस्ता डांबरीकरण करणे | १२.७५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४७ विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | --- | ४.७५ लाख |
| वॉर्ड क्र. ४७ विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे | --- | ४ लाख |
| वॉर्ड क्र. ४७ विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे | --- | ४ लाख |

Unregistered

**विषय क्र. १४२**

संदर्भ :- १) मा.श्रीमती इंदुमती फुलावरे यांचे दि. २/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३४, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४७ मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र.३, शहरात विविध रस्त्यांवर फुटपाथ करणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे व साईडपट्ट्या करणे, (यादी एस-१), पान क्र. २५५, अ.क्र. ३४, वॉर्ड क्र. ४७ श्रमिकनगर, मंगळवार पेठ याठिकाणी संपुर्ण भागात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४७ मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्र. १४३</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.कविता वैरागे व मा.उज्जवल केसकर यांचे दि. ३/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३५, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्रसाहित्य सम्राट लोकशाहीर साठे महोत्सव साजरा करणेकरीता र.रु. १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पथ विभागाकडील कामाच्या याद्या, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, , (यादी ए–२), पान क्र. २४८, अ.क्र. २०६, वॉर्ड क्र. १०७ नाईक पुल ते गुलाबराव ताटे पथ दरम्यान कॅनॉल रस्ता तयार करुन ग्राऊट करणे व पावसाळी लाईन टाकणे | ५ लाख | --- |
| २) ४.ग.व.नि.निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र. १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एस–४), पान क्र. ३०१, अ.क्र. ४०, वॉर्ड क्र. ९८ यासीन जुग दर्गा वसाहतमध्ये ड्रेनेज लाईन व अंतर्गत गल्लीबोळ कॉंक्रीट करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महोत्सव साजरा करणे | --- | १० लाख |

मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात यावा. तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र. १४४</u>**

संदर्भ :– १) मा.संजय भोसले व मा.अशोक हरणावळ यांचे दि. ३/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३६, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २१ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटींग करणेसाठी र.रुपये ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, सीपीटीएल ३१, वॉर्ड क्र. २१ संगमवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमध्ये ठिकठिकाणी बोअरवेल घेणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. २१ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटींग करणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्र. १४५</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.रेखा चंद्रकांत टिंगरे यांचे दि. ३/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५३७, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १ धानोरी येथील विविध ठिकाणचे धोकादायक विद्युत पोल काढून अंडरग्राऊंड केबल टाकणेसाठी र.रुपये ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०. पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६४, अ.क्र. २५१, चालू कामांसाठी जादा लागणारी तरतूद, (यादी क्र. ए–३), पान क्र. २५३, अ.क्र. ७, ५/९ धानोरी रस्ता विकसित करणे | ५ लाख | --- |

UnRegistered

नविन सुचविलेले काम

वॉर्ड क्र. १ धानोरी येथील विविध ठिकाणचे धोकादायक विद्युत पोल काढून
अंडरग्राऊंड केबल टाकणे --- ५ लाख

**<u>विषय क्र. १४६</u>**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(जिंघ)से/३२८ दि. २६/६/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५४६, दि. २२/७/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण विभागाकडील तत्कालिन कार्यरत श्री.मोहन दगडू मारणे, आरेखक, विकास अभियंता (प्रकल्प) कार्यालय व श्री.सचिन विठ्ठलराव खेडेकर, ज्यु.ग्रेड लेखनिक, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचेविरुध्द अभियोग दाखल करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १४७</u>**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. सीडीआर-१३०७/प्र.क्र.३/०७/११/-अ दि. १८/१०/२००७.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७९ दि. १७/४/२००८ चे पत्र.
४) विधी समिती ठराव क्र. ९ दि. ७/५/२००८.
५) स्थायी समिती ठराव क्र. ५७२, दि. २२/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन व स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडील सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असलेल्या सेवक/अधिकारी यांना कामावर रुजू करुन घेणेस व सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील शासनाच्या नियमाप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणे यासाठी याबाबत प्रचलित मनपा सेवाविनियम क्र. ५८ मध्ये दुरुस्ती करुन मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्टाप्रमाणे येथून पुढे कार्यवाही करणेस

२) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील या प्रकरणी निलंबित झालेल्यांसाठी जर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असेल व दोषारोप सादर केले नसेल आणि पद रिक्त राहत असेल तर दोषारोप सादर होईपर्यंतच्या काळात रुजु करुन घ्यावे याबाबत मे.राज्य शासनाकडून प्रसृत करण्यात आलेल्या अथवा याबाबत मे.राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या शासन आदेशामधील मार्गदर्शक तत्वांनुसार पुणे महानगरपालिकेमधून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबन मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेस

Unregistered

**<u>विषय क्र. १४८</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेपुअ/३०९ दि. २०/६/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५७६, दि. २२/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

म्हाळुंगे गावठाणातील विविध रस्त्याचे डांबरीकरण व गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे हे काम मनपा हद्दीबाहेरील असल्याने मनपा निधीतून काम करुन घेणेस बी.पी.एम.सी.ॲक्टचे कलम ८९ नुसार या कामांसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) म्हाळूंगे गाव मनपा हद्दीत समाविष्ठ नसल्याने व सदर कामास जेएनएनयुआरएम अंतर्गत निधी उपलब्ध नसल्याने सदर र.रुपये १,४०,००,०००/- चे काम पुणे मनपा निधीतून बी.पी.एम.सी.ॲक्टचे कलम ८९ नुसार करणेस

२) म्हाळुंगे गावातील रस्त्याचे डांबरीकरण व गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे हे काम पुणे मनपा निधीतून आगामी राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धेपुर्वी करण्यासाठी कामाचे पुर्वगणनपत्रक व टेंडर प्रक्रिया करणेस

**विषय क्र. १४९**

संदर्भ :- १) मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ५/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ५८३, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २ विद्यानगर–लोहगांव परिसरामध्ये विद्युत व्यवस्था करणेकरीता र.रुपये १७ **लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १७२, अ.क्र. ६३, शहरात विविध ठिकाणी रस्ता रुंदीकरणामुळे काढावयाचे धोकादायक पोल्स, (यादी क्र. बी–६),पान क्र. २८१, अ.क्र. ३, वॉर्ड क्र. २, विद्यानगर–लोहगांव येथील परिसरातील धोकादायक विद्युतपोल्स शिफ्ट करुन भुमिगत केबल टाकणे | १७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>विद्यानगर–लोहगांव परिसरामध्ये विद्युत व्यवस्था करणे | --- | १७ लाख |

**विषय क्र. १५०**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(ज)/पं.ने.स्टेडियम/३६१, दि. ५/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ६०१, दि. २२/७/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

महापौर चषक फेडरेशन कप राष्ट्रीय कुमार मैदानी स्पर्धा व पाचवी राष्ट्रीय युवा स्पर्धा २००८ साठी पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेला मा.महापौर यांनी शिफारस केल्यानुसार पं.नेहरु स्टेडियम विभागाकडील खालील नमूद केलेल्या अर्थशिर्षकामधून पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेला महापौर चषक आठवी राष्ट्रीय फेडरेशन कप ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा व पाचवी राष्ट्रीय युवा स्पर्धा २००८ करीता प्रत्यक्ष खर्चानुसार र.रुपये १४,८०,०००/– (रुपये चौदा लाख ऐंशी हजार फक्त) आदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००८–०९, १०–खेळ व क्रिडांगणे, क–पंडित नेहरु स्टेडियम, १३–राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा (महापौर चषक), तरतुद र.रुपये २१,३०,०००/– (यामधुन र.रुपये ६,३०,०००/–) व १४–राष्ट्रीय कॉस कंट्री स्पर्धा आयोजित करणे, तरतुद र.रुपये ८,५०,०००/– (र.रुपये ८,५०,०००/–) (एकूण र.रुपये १४,८०,०००/–)

**विषय क्र. १५१**

संदर्भ :- १) मा.वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र. कक्ष–१/३ वस/योजनेतर(१)१९४, सन २००८–०९ दि. ३/६/२००८ (२) २४३, दि. १२/६/२००८.

२) मा.वनमंत्री (वने) व मा.आयुक्त, मनपा पुणे यांनी दि. २८/६/२००८ रोजी पाहणी दौऱ्यात समक्ष दिलेल्या सुचना.

३) मा.वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. कक्ष–४/योजनेतर/सिंहगड प्रस्ताव/३३३ दि. १/७/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उकाजा/३७६ दि. ८/७/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र. ६०२, दि. २२/७/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका व वनविभाग पुणे यांचे संयुक्त विद्यमाने वनविभागाच्या नियंत्रणाखालील सिंहगड परिसरातील कंपार्टमेंट नं. २४१ व २४५ मधील क्षेत्र १२०० हेक्टरवर संयुक्त वन व्यवस्थापन प्रकल्प राबविणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) किल्ले सिंहगड परिसर विकास प्रकल्प वनविभाग यांचे संयुक्त विद्यमाने राबविणेस

२) सदरहू प्रकल्प राबविणेस वनविभागास ३ वर्षांसाठी आवश्यक आर्थिक सहाय्य खालील तकत्यात नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देणेस

Unregistered

| सन | खर्चाचा तपशील |
|---|---|
| २००८-०९ | १,७०,००,००० |
| २००९-१० | ५०,००,००० |
| २०१०-११ | ४०,००,००० |
| एकूण र.रुपये | २,६०,००,००० |

३) सदरहू प्रकल्प राबविणेसाठी वनविभागाबरोबर आवश्यक तो करारनामा करणेस

**<u>विषय क्र. १५२</u>**

संदर्भ :- १) मा.सुनिल गोगले व मा.सुनिल टिंगरे यांचे दि. १०/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६०८, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १६ मध्ये नदीपासून आळंदी रस्ता ते मेंटल हॉस्पिटलपर्यंत नाला चॅनलायझेशन करणेसाठी र.रुपये ५९.५० **लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, | | |
| १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६४, अ.क्र. २५१, चालु कामासाठी जादा लागणारी तरतूद (यादी क्र. ए-३), पान क्र. २५३, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. १६ आळंदी रस्ता सोसायटी ते अग्रसेन शाळा रस्ता करणे | ४२.५० लाख | --- |
| पान क्र. १४८, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र. ए-२), पान क्र. २४४, अ.क्र. २९, वॉर्ड क्र. १६ प्रतिकनगर स्वातंत्र्य सैनिकनगर मधील रस्ते करणे | १७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १६ मध्ये नदीपासून आळंदी रस्ता ते मेंटल हॉस्पिटलपर्यंत नाला चॅनलायझेशन करणे | --- | ५९.५० लाख |

**<u>विषय क्र. १५३</u>**

संदर्भ :- १) मा.शैलेंद्र नलावडे व संजय नांदे यांचे दि. ८/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६१०, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १२४ बिबवेवाडी ओट्याच्या मागील ओढ्याला सिमाभिंत बांधणेसाठी र.रुपये १२.७५ **लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ३०, अ.क्र. २, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स), उपमुख्य नलिका, मलनि:सारणासंबंधी इतर कामे, स्थापत्य कामे व साधन सामुग्री, (यादी क्र. डी-१बी), जलोत्सारण खात्याकडील याद्यामधील पान क्र. ५०, अ.क्र. ३७, स्वामी विवेकानंद रोडवर पेट्रोल पंपापासून महेश सोसायटीपर्यंत उर्वरित ९०० मि.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | १२.७५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२४ बिबवेवाडी ओट्याच्या मागील ओढ्याला सिमाभिंत बांधणे | --- | १२.७५ लाख |

Unregistered

**<u>विषय क्र. १५४</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.चाँदबी नदाफ व मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. १५/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ६१२, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ३९ मध्ये प्रायव्हेट रोड येथील झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकणे व गल्लीबोळात फरशी बसविणेसाठी र.रुपये १५ **लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६४, अ.क्र. २३७, पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र. एस–३३), पान क्र. २५८, अ.क्र. १४, मंगलदास रोडवरील नॅथनरोड व अब्बास गल्ली येथे पावसाळी लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ३९ मध्ये प्रायव्हेट रोड येथील झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकणे व गल्लीबोळात फरशी बसविणे | --- | १५ लाख |

**<u>विषय क्र. १५५</u>**

संदर्भ :- १) मा.श्रीमती इंदुमती फुलावरे यांचे दि. १६/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ६१४, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४७ मध्ये पी.एम.सी.कॉलनी क्र. २ येथे ७३ खोल्यांचे जुने पत्रे काढून नविन पत्रे टाकणेसाठी र.रुपये ५ **लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे,४.अ.मागसवर्गीय कल्याणकारी योजना निधी, पान क्र. २३४, अ.क्र. १२, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर बांधणे, (यादी क्र. एस–३७), पान क्र. ३०७, अ.क्र. १२, वॉर्ड क्र. ४७, प्लॉट नं. ४ येथे समाजमंदिर बांधणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ४७ मध्ये पी.एम.सी.कॉलनी क्र. २ येथे ७३ खोल्यांचे जुने पत्रे काढून नविन पत्रे टाकणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्र. १५६</u>**

संदर्भ :- १) मा.सागर माळकर व मा.तानाजी लोणकर यांचे दि. १६/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ६१६, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेने मा.मुख्य सभा ठराव क्र. २८७ दि. १७/१०/२००६ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील स्वातंत्र्य सैनिकांस मिळकतकरातील सर्वसाधारण कर पूर्णपणे माफ करण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे. त्यास मे.राज्य शासनानेदेखील मान्यता दिलेली आहे. मात्र माजी सैनिकांना अशा प्रकारची कुठलीही सवलत दिली जात नाही. अन्य महानगरपालिकांमध्ये अशा पध्दतीची सवलत देण्यात येते.

देशाची एकता, अखंडता अबाधित ठेवण्याकरीता ऐन तारुण्यामध्ये माजी सैनिकांनी देशाचे रक्षण केलेले आहे. त्यामुळे माजी सैनिक अथवा त्यांच्या विधवा पत्नीस एकाच निवासी घरावर मिळकतकराच्या अन्य करांमध्ये संपूर्ण सवलत देण्यास तसेच याबाबत नियमावली तयार करण्याचा अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

**विषय क्र. १५७**

संदर्भ :- १) मा.विकास दांगट व मा.संतोष फरांदे यांचे दि. ३/४/२००८ चे पत्र
२) स्थायी समिती ठराव क्र. ५६ दि. ८/४/२००८
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/भवन/४१५ दि. १६/७/२००८ ने पाठविलेला अभिप्राय
४) स्थायी समिती ठराव क्र. ६२३, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १३० मध्ये दांगट पाटील विद्यालय येथील डी.पी.रोडला सिमाभिंत (पडदी) बांधणेसाठी र.रुपये ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. २०६, अ.क्र. १७, शहरातील विविध भाजी मंड्या मध्ये विकास कामे करणे, (यादी क्र. एस-२९), पान नं. २९६, अ.क्र. १२, वॉर्ड क्र. १३० मध्ये विविध ठिकाणी भाजी मंड्या बांधणे, | ३० लाख | --- |
| १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८२, अ.क्र. ८७, शहरात विविध ठिकाणी संरक्षण भिंत व सिमाभिंत बांधणे, (यादी क्र. एस-१५), पान नं. २९१, अ.क्र. ९, वॉर्ड क्र. १३० चंद्रकांत दांगट विद्यालय विद्यानगर येथील डी.पी.रोडवर सिमाभिंत करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १३० मध्ये दांगट पाटील विद्यालय येथील डी.पी.रोडला सिमाभिंत (पडदी) बांधणे | --- | ४० लाख |

**विषय क्र. १५८**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/३८२ दि. ११/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६४१, दि. २२/७/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

सन २००७-२०१२ मनपा मिळकतींमधील आंबा, चिंच व कवठ, नारळ वृक्षांच्या फळबहाराची विक्री करणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.सुरेश गेनबा शिंदे यांची निविदा दोघात जास्त रकमेची असल्याने त्यांनी ठेक्याप्रित्यर्थ मनपाचे आधारभूत रकमेपेक्षा रुपये ३,०००/- जास्त देऊ केलेले आहेत. तरी श्री.सुरेश गेनबा शिंदे (ठेकेदार) यांना सन २००७-२०१२ पर्यंत ५ वर्ष मुदतीचा चिंच, आंबा, कवठ व नारळ फळबहाराचा ठेका एकूण र.रुपये ३,०३,०००/- देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

Unregistered

**विषय क्र. १५९**

संदर्भ :- १) श्री.दिपक टिळक, अध्यक्ष, कै.म.म.दत्तो वामन पोतदार यांचे मा.महापौर यांना आलेले दि. ८/१/२००८ चे पत्र.
२) मा.नगरसचिव यांचे विषयपत्र जा.क्र. ६५६६ दि. १४/१/२००८
३) स्थायी समिती ठराव क्र. १६७७ दि. २२/१/२००८
४) मुख्य सभा ठराव क्र. ५ दि. २२/४/२००८
५) मा.मुख्य लेखापाल यांचे क्र. १८४६ दि. ६/६/२००८ चे पत्र.
६) मा.नगरसचिव यांचे क्र. २१५८ दि. १७/७/२००८ चे पत्र.
७) स्थायी समिती ठराव क्र. ६५२, दि. २२/७/२००८.

---

मा.नगरसचिव यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सन २००८-०९ चे अंदाजपत्रकात शहरात विविध ठिकाणी सांस्कृतिक हॉल व स्मारके बांधणे या अर्थशिर्षकाखाली कै.महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार स्मारक बांधणेसाठी र.रुपये १० लक्ष अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) कै.महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार स्मारक समितीस र.रुपये १० लक्ष आदा करणेस

२) सदर रकमेचा विनियोग मनपा हद्दीबाहेर होणार असल्याने महाराष्ट्र शासनाची आवश्यक ती मान्यता घेण्यास

**विषय क्र. १६०**

संदर्भ :- १) मा.शांतीलाल मिसाळ, मा.सुनिल बनकर व मा.सुनिल बिबवे यांचे दि.१७/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६५४, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

क्रांतीवीर लव्हुजी वस्ताद साळवे हे महात्मा ज्योतिबा फुले यांची शस्त्र विद्या गुरु होते याची नोंद इतिहासात आहे. तसेच त्यांनी अनेक स्वातंत्र्यवीर घडविले आहेत. त्याचप्रमाणे बहुजन समाजाच्या स्त्रियांना व अस्पृश्य समाजाला शिक्षण मिळावे यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांना सहकार्य व संरक्षण देवून सर्व बहुजन समाजाला बहुमोल सहकार्य केलेले आहे.

आज नविन पिढीला त्यांच्या विचारांची, कर्तृत्वांची प्रेरणा मिळावी व त्यांचे स्मरण रहावे यासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे त्यांच्या जयंतीनिमित्त लव्हुजी फेस्टिवल साजर करण्यासाठी अंदाजपत्रकात २५ लाख रुपयांची तरतूद करण्यास व मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १६१**

संदर्भ :- १) मा.लक्ष्मण आरडे यांचे दि. १७/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६५५, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे शहरामध्ये क्रांतीवीर लहुजी वस्तादांचे वास्तव्य होते आणि आहे. क्रांतीवीर लहुजी वस्तादांनी पुणे शहराला स्वतंत्र सेनानी घडवून या देशाला स्वतंत्र करण्यासाठी दिले परंतु क्रांतीवीर लहुजी वस्ताद हे गरीब कुटूंबामध्ये जन्मले परंतु शासनाकडून त्यांनी केलेले सामाजिक व देशहिताचे कार्य समाजातील शेवटच्या माणसापर्यंत क्रांतीवीर लहुजी वस्तादांचे कार्य समाजामध्ये पोहोचले नाहीत म्हणून १४ नोव्हेंबरला जयंती साजरी करण्यासाठी व जयंतीच्या माध्यमातून समाज परिवर्तन, शैक्षणिक विकास प्रबोधन व मनोरंजन असे विविध कार्य करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने र.रुपये २५ लाखापर्यंत सहप्रायोजकत्व स्विकारण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

UnRegistered

**विषय क्र. १६२**

संदर्भ :- १) मा.महादेव बाबर व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २२/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६५६, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन–

एन.डी.ए.खडकवासला याठिकाणी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा मनपाचे वतीने उभारण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. पुतळा व चौथऱ्याच्या कामासाठी र.रुपये ३० लाख खर्च येणार आहे. ही रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६३**

संदर्भ :- १) मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. २२/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६६३, दि. २२/७/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन–

कु.किरण जयवंत वरपे, रा.कोथरुड, पुणे ३८ ह्याची भारतीय कुस्ती संघात निवड झालेली असून ही स्पर्धा २५ ते २७ जुलै २००८ आशियाई कुस्ती, उझबेकिस्तानामधील ताश्कंदामध्ये होणार असून जाण्या–येण्यासाठी, निवास, भोजन इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येणार आहे.

कु.किरण जयवंत वरपे ह्याने राष्ट्रीय स्पर्धेत दोन रौप्य व एक ब्रॉंझपदक तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेत

मामासाहेब मोहोळ केसरी हा किताब मिळविला आहे.

तरी कु.किरण जयवंत वरपे यांना आशियाई कुस्ती, उझबेकिस्तानामधील ताश्कंदामध्ये होणाऱ्या कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून खास बाब म्हणून आर्थिक सहाय्य र.रुपये १,००,०००/- देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १६४**

संदर्भ :- १) संरक्षण खात्याचा जा.क्र. ४१११/डीईव्हीपी/पीएमसी/क्यु३ (एल ॲण्ड एच) दि. १२/५/२००८ चा प्रस्ताव व त्या अनुषंगाचे दि. १८/७/२००८ रोजीचे पत्र.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/४३६ दि. २२/७/२००८ चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्र. ६६५, दि. २२/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे विचारात घेऊन -

पुणे शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ६ प्रमुख रस्त्यांच्या करणेत येत असलेल्या रुंदीकरणामधील बाधित संरक्षण खात्याच्या जागांवर प्रत्यक्ष काम करणेसाठी पुणे मनपास संरक्षण खात्यातर्फे ना हरकत पत्रे मिळालेली आहेत. सरक्षण खात्याने केलेल्या बहुमुल्य सहकार्यामुळेच पुणे महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच संरक्षण विभागाने त्यांचेकडील जमिनी पुणे मनपाकडे हस्तांतरीत करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्रे दिलेली आहेत व या जागांवर प्रत्यक्ष कामही सुरु झालेले आहे.

संदर्भांकित क्र. १ चे प्रस्तावाद्वारे संरक्षण खात्याने पुणे शहराचे हद्दीमध्ये जागतिक स्तराच्या संरक्षण खात्याच्या शैक्षणिक संस्थेची निर्मिती करणेचे उद्देशाने पुणे मनपाकडे शाळांसाठी आरक्षित जमिन मागितली आहे. संरक्षण खात्याने पुणे शहराच्या प्रमुख रस्त्यांच्या रुंदीकरणाकरीता केलेले बहुमुल्य सहकार्य लक्षात घेता संरक्षण खात्याच्या मागणीप्रमाणे त्यांना कल्याणीनगर येथील फा.प्लॉट क्र. ७५ एकूण क्षेत्रफळ ७१५७ चौ.मी. ही पर्यायी जागा मा.नगर अभियंता ठरवतील त्या दराने हस्तांतरीत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १६५**

संदर्भ :- १) मा.उपसंचालक, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांचे जा.क्र. एसई (सी) पुणे /२१ बी / २००६ दि. २/६/२००८ चे पत्र.

२) मा.महासंचालक, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, भारत सरकार यांचेसोबत दि. १३/६/२००८ रोजी झालेली बैठक.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(भुजिं)/४३५ दि. २२/७/२००८ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्र. ६६६, दि. २२/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे शहराचे सर्वांगीण विकासासाठी जेएनएनयुआरएम, सीवायजी, आयआरडीपी अंतर्गत विविध विकास कामे प्राधान्याने चालू आहेत. या विकास कामांमध्ये पुणे शहरातील महत्वाचे रस्त्यांचे विकास आराखड्यानुसार रुंदीकरण करणे ही प्राधान्याची बाब आहे. त्याअन्वये रस्तारुंदीकरणाची कार्यवाही करणेकरीता या रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या विविध मिळकतींचा तडजोडीने अथवा भूसंपादन कायद्यान्वये ताबा घेणेत येतो. परंतू सदर बाधित जागा शासकीय मालकीची अगर संरक्षण खात्याची असल्यास ही जागा ताब्यात घेणेकरीता रितसर प्रस्ताव सादर करुनच प्रदिर्घ कालावधीनंतरच ताबे मिळतात.

पुणे आळंदी रस्ता हा पुणे शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी एक आहे. या रस्त्याचे विकास आराखड्यानुसार ६०.०० मी.चे रुंदीकरणाची प्रक्रिया चालू आहे. या रस्तारुंदीकरणाकरीता या रस्त्यावरील रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या सर्व जागांचे ताबे घेणेत आलेले आहेत व त्याठिकाणी प्रत्यक्षात कामही सुरु झालेले आहे. परंतु या रस्त्यावरील केवळ जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या ताब्यातील बाधित जागा अद्याप पुणे मनपाचे ताब्यात आलेली नाही. या बाधित जागेचा ताबा घेणेची प्रक्रिया मागील ३ वर्षांपासून चालू होती. परंतु मागील दोन वर्षातील सर्वकष पाठपुरावा तसेच स्थानिक पातळी ते मिनीस्ट्री ऑफ माईन्सपर्यंत झालेल्या विविध बैठकांचा परिणाम म्हणून संबंधित खात्याने रस्तारुंदीकरणाकरीता जमिन पुणे मनपाकडे हस्तांतरीत करणेसाठी काही अटी शर्तींचे अधीन राहून तयारी दर्शविली आहे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाकडून जागा मिळणेसाठी स्थानिक पातळीपासून ते अतिवरिष्ठ पदाधिकारी, अधिकारी यांचे समवेत वेळोवेळी बैठका झाल्या असून त्या बैठकांमध्ये मनपा व जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, पुणे या दोन्हींच्या हिताचे दृष्टीने काही

Unregistered

बाबींवर एकमत करणेत आले आहे व याबाबी सदरचे मिटींगमध्ये तत्वत: मान्य करणेत आल्या आहे.

सबब या संदर्भात मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतच्या सहपत्रानुसार कार्यवाही करणेकरीता जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांचेशी जागा हस्तांतरण करार करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. १६६**

संदर्भ :- १) मा. ॲड.निलेश निकम व उज्ज्वल केसकर, मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा.अरूण धिमधिमे, मा. सुभाष जगताप यांचे दि. २३ /६ / ०८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७३, दि. १/७/२००८.

---

पुणे शहरात आय.टी.इतर उद्योगांना दिल्या जाणा–या सवलतीमुळे मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे पुणे शहरात आलेलेत आहेत व नजिकच्या काळात मोठ्या कंपन्या पुणे शहरात आपले उद्योगधंदे सुरू करणार आहेत. तशा प्रकारच्या काही कंपन्यांनी घोषणाही केली आहे. या सर्व उद्योगांना मोठ्या प्रमाणावर मणुष्यबळ लागणार आहे. त्यासाठी देशातील इतर भागातून यानिमित्त पुणे शहरात मध्यमवर्गीय / सर्वसामान्य चाकरमणी माणसे मोठ्या प्रमाणावर आलेली आहेत व भविष्य काळात येणार आहेत. शहरात नविन लोकांसाठी शहर परिसरात व शहरालगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर घरबांधणी प्रकल्प उभे राहत आहेत. या उभारण्यात येणा–या गृहप्रकल्पातील सदनिका ह्या सुमारे १००० चौ.फुटाच्या आसपास अगर त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या असल्याने सर्वसामान्य नोकरदार माणसांना ह्या नविन होणा–या सदनिका इच्छा असूनही किंमतीमुळे घेणे शक्य होत नाही.

पुणे शहरात नविन उद्योगधंदे निमित्त येणा–या सर्वसामान्य नोकरदार माणसांना आपल्या कुटुंबियासह राहणेसाठी जागा उपलब्ध होऊ शकत नाही. व ज्या काही सदनिका उपलब्ध आहेत, त्या घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे तो नाईलाजास्तव तो अनाधिकृत असणा–या स्वस्त बांधकामाकडे आश्रयास जात आहे. अथवा झोपडपट्टीसारख्या भागातही आश्रय घेत आहे. त्यामुळे महानगरपालिकेसही नागरी सुविधा पुरविण्या संबंधी अडचणी येत आहेत. या सर्व गोष्टी विचार करून सर्वसामान्य चाकरमानांना / नागरिकांना सदनिका उपलब्ध होणेसाठी म.न.पा.तर्फे बांधकाम नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

तरी पुणे शहरातील सर्वसामान्य चाकरमानांना / नागरिकांना सदनिका उपलब्ध होणेसाठी व घरबांधणीस चालणा देणेसाठी निवासी ( रेसिडेन्शियल ) झोनमध्ये ३०० चौ.फुट ( कारपेट एरिया ) सदनिका उपलब्ध करून देणा–या गृहप्रकल्पांना / विकसकांना २.५ एफ.एस.आय. देण्यात यावा. परंतु या गृहप्रकल्पामध्ये ३०० चौ.फुटापेक्षा जास्तीची एकही सदनिका असू नये असे बंधन असावे. तसेच सदर गृहप्रकल्पातील सदनिकांचे एकत्रिकरण करण्यास मनाई असावी. या नियमाप्रमाणे निर्माण होणा–या गृहप्रकल्पांना नागरिसुविधा पुरविणेसाठी काही प्रमाणात प्रिमियम आकारण्यात यावा. यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट मध्ये बदल करणेसाठी ३७(१) ची कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी,अशी मुख्य़सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

**विषय क्र. १६७**

संदर्भ :- १) मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. अमआ/सहमआ/१६२, दि. ८/५/०८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७४, दि. १/७/२००८.

---

मा. अति.महापालिका आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

म न पा प्रशासनाकडील हेड टेलिफोन ऑपरेटर ( वे.श्रे.रूपये ४५००/– ते रूपये १००५५/– + मान्य भत्ते) या पदावर बढतीने नेमणूक करणेसाठी खालील निवड यादीस तसेच निवड यादीवरील सेविकेची हेड टेलिफोन ऑपरेटर या पदावर बढतीने नेमणूक करणेस मान्यता द्यावी अशी मा मुख्य सभेकडे शिफारस आहे

**– निवडयादी जागा –**

| अ.क्रं. | उमेदवाराचे नांव व गट |
| --- | --- |
| १ | श्रीमती निलिमा यशवंत पंडित ( इमाव ) |

**विषय क्र. १६८**

संदर्भ :- १) मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे क्रं.मआ/सहमआ/सेवि/१३९, दि.३०/४/०८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७६, दि. १/७/२००८.

---

मा. अति.महापालिका आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे ---

पुणे महानगरपालिकेच्या कर्मशाळा विभागाकडे हेल्पर ( एकवट वेतन प्रथम वर्ष रू.२७०० / - द.म., द्वितीय वर्ष रू.३२०० / - द.म., तृतीय वर्ष रू.३७०० / - द.म.व तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतन श्रेणी रू.२७५० ते रू.५६९० + मान्यभत्ते ) वर्ग ३ च्या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी खालील प्रमाणे शिफारस केलेल्या निवड यादीस व प्रतिक्षा यादीस व त्यावरील उमेदवारांची सदर पदांच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मुख्यसभेकडे शिफारस आहे.

हेल्पर या पदासाठी निवडयादी अनुसूचित जमाती गटासाठी - १ जागा

| **क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | कोकाटे विकास खेमाजी |

हेल्पर या पदासाठी प्रतिक्षायादी अनुसूचित जमाती गटासाठी

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १ | गावित संजय मगन |

हेल्पर या पदासाठी निवडयादी विमुक्त जाती अ- गटासाठी -१ जागा

| **क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | गायकवाड विनोद भारत |

हेल्पर या पदासाठी प्रतिक्षायादी विमुक्त जाती अ- गटासाठी

| **क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | गावडे अनिल बाळासाहेब |

हेल्पर या पदासाठी निवडयादी भटकी जमात क- गटासाठी -१ जागा

| **क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | पांढरे हनुमंत शेषराव |

हेल्पर या पदासाठी प्रतिक्षायादी भटकी जमात क- गटासाठी

| **क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | घोडके सतीश राजाराम |

**विषय क्र. १६९**

संदर्भ :- १) मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/उआ ( जिंघ) से/३६२, दि.७/७/०८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८४ द. २४/७/२००८.

---

मा. अति.महापालिका आयुक्त (वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे ---

पुणे महानगरपालिकेच्या भवन रचना विभागाकडे पेंटर ( समय वे.श्रे.रू.२७५० - ५६९०+मान्य भत्ते ) या वर्ग ३ हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी वरीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस व त्यावरील उमेदवारांची सदर पदाच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून वेळोवेळी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मुख्यसभेकडे शिफारस आहे.

सदर निवडयादी, निवडयादीवरीले सर्व उमेदवार हजर होईपर्यंत अगर एकवर्ष किंवा यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील.

**निवडयादी**

**खुला प्रवर्ग**

| **अ.क्र.** | **सेवकाचे नाव** |
|---|---|
| १ | श्री. महेश रामचंद्र शेजवळ |
| २ | श्रीमती वैशाली शंकर शिंदे. |

**विषय क्र. १७०**

संदर्भ :- १) मीरा दामोदर कोसंबी यांचे दि. २८.१२.२००७ चे पत्र.
२) मा. महा.आयुक्त यांचे क्र.मआ/नअ/१३२८, दि. ५.३.२००८ चे पत्र.
३) मा. अविनाश बागवे व मा. विजय मारटकर यांचे दि. २४.७.२००८ ची उपसूचना.
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८६ द. २४/७/२००८.

UnRegistered

---

शहर सुधारणा समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार –

पुणे पेठ शिवाजीनगर ओ. प्लॉट नं.१८६ सि.स.नं. ८२५ या मिळकतीचा भाग विकास आराखड्यामध्ये असितत्वातील रस्ता म्हणून दर्शविला असून बी फॉर्म मालकी हक्क पुणे मनपा असे असून शेरा मध्ये road area of B.O.R.I. lay out public road in the final scheme nominal compensation Rs. 1 for area to be given to B.O.R.I. असे नमूद केले आहे. यास्तव संपूर्ण ओ. प्लॉट नं.१८६ सि.स.नं. ८२५ चे रस्ता रद्द करून निवासी करणेकामी एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९२ व ३७(१) अन्वये व्हेरियेशन चालू करण्याचा प्रस्ताव दाखल असून या बाबत ओ. प्लॉट नं.१८६ चे एकूण क्षेत्रापैकी फक्त प्लॉट नं.१४० ते १४५ या मिळकतीमधील ओ. प्लॉट नं.१८६ चे क्षेत्र निवासी करणेबाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९२ व ३७(१) अन्वये कार्यवाही करण्यासाठी त्यादृष्टीने सदर कार्यवाहीचा भाग म्हणून शासकीय राजपत्र व दैनिक इंग्रजी, मराठी वृत्तपत्रात जाहीर प्रकटन देऊन नागरिकांचा हरकती व सूचना मागविण्यास मान्यता द्यावी अशी मुख्यसभेची शिफारस आहे.

## महिला बाल कल्याण समितीचे ठराव

**विषय क्र. १७१**

संदर्भ :– १) मा. अति.महापालिका आयुक्त ( वि ) यांचे मआ/उआ (जिंघ) / से /३२५, दि.२६/६ /२००८ चे पत्र.

२) मा. महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. २९, दिनांक ८/७/२००८.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाच्या आरोग्य खात्याकडील स्टुअर्ड वर्ग – ३ ( वेतनश्रेणी रू. ५००० ते ११२२५ + मान्य भत्ते ) या पदावरील नेमणुकीबाबत शिफारस केलेल्या निवड / प्रतीक्षायादी वर खालील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, आरक्षण / अनुशेष इ.बाबी विचारात घेवून मा. महापालिका आयुक्त यांनी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मुख्यसभेकडे शिफारस आहे.

स्टुअर्ड पदाची प्रतिक्षायादी, निवडयादीवरील उमेदवार सदर पदावर रूजू झाल्यानंतर जास्तीत जास्त १ वर्षे कालावाधीसाठी अस्तित्वात राहील. त्यानंतर ती संपुष्टात आली असे समजण्यात येईल.

**– निवडयादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. काळबांडे राजाभाऊ नागीराव ( मनपा सेवक ) |
| २ | श्रीमती मासाळ संगिता रेवजी ( मनपा सेवक ) |

**– प्रतिक्षायादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. निम्हण प्रदिप प्रभाकर ( मनपा सेवक ) |

Unregistered

**विषय क्र. १७२**

संदर्भ :– १) मा. अति.महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. अतिमआ/उजाका/से/२६५, दि. ५/६/०८ चे पत्र.

२) मा. महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ३३, दिनांक ८/७/२००८.

---

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाच्या माध्यमिक विद्यालयाकडील प्रयोगशाळा सहायक ( वे.श्रे.रू.३२३५ ते ७३०० + मान्य भत्ते ) या हुद्दयाच्या जागांवर बढतीने नेमणूका करणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस तसेच निवडयादीवरील क्रम, अनुशेष / आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश इ.बाबी विचार करून मा.महापालिका आयुक्त यांनी वेळोवेळी नेमणूका करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे

**–निवडयादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सध्याचा हुद्दा | जातीचा गट |
|---|---|---|---|
| १ | श्री.सातव गजानन राघोजी | प्रयोगशाळा मदतनीस | इमाव |
| २ | श्रीमती जमदाडे उज्वला रमेश | प्रयोगशाळा मदतनीस | खुला |
| ३ | श्री. वाळिंबे समिर बाळकृष्ण | प्रयोगशाळा मदतनीस | खुला |

## शिक्षण मंडळाचे पत्र

**विषय क्र. १७३**

संदर्भ :– १) मा. विनायक चाचर व मा. मिलींद कांबळे, सदस्य शिक्षण मंडळ यांचा दिनांक २३/६/२००८ चे पत्र.

२) मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. ५४, दिनांक २३/६/२००८.

–––

मा. विनायक चाचर व मा. मिलींद कांबळे, सदस्य शिक्षण मंडळ यांचा प्रस्ताव अवलोकन केला. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. एमएओ ३१०८/प्रक्र १८/(१)/प्रशा–२ दिनांक १५/५/२००८ अन्वये शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक विभाग पुणे महानगरपलिका या पदावर प्रतिनियुक्तीने दोन वर्षाच्या कालावधीसाठी श्री. सुधाकर मनोहर तांबे यांची नियुक्ती झालेली आहे.

शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे मनपा हे पद सध्या रिक्त असल्याने सदर पदाचा अतिरिक्त पदभार श्री. सुधाकर मनोहर तांबे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग यांचेकडे दिलेला आहे. वास्तविक पाहता शिक्षण प्रमुख पदाच्या कामाचा आवाका जास्त असल्याने सदर पदाचा श्री. सुधाकर तांबे यांचेकडे पूर्णवेळ पदभार देणे आवश्यक आहे.

श्री. सुधाकर तांबे यांनी यापूर्वी पिंपरी–चिंचवड महापालिकेचे शिक्षण प्रमुख म्हणून अतिशय यशस्वीपणे काम केलेले आहे, त्यांच्या अनुभवाचा पुणे मनपा शिक्षण मंडळाकडील शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणेसाठी निश्चित उपयोग होणार असल्याने श्री. सुधाकर तांबे यांची पुणे मनपा शिक्षण मंडळाकडे शिक्षण प्रमुख या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात यावी अशी महाराष्ट्र शासनाकडे विनंती करणेबाबत मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

## मा. महा. आयुक्त यांचे पत्र

**विषय क्रं. १७४**

पुणे मनपा प्रशासनाकडे ''अतिरिक्त आयुक्त (जनरल)'' या पदावर श्री. एस. एम. देवणीकर यांची दि. १६/६/२००८ रोजी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आल्याबाबत महाराष्ट्र शासन आदेश क्र. एईओ–११०८/(१०)(५)/२००८/दहा,दि. १५/५/२००८ चे पत्राची नोंद घेण्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/उआ जिंघ/सेवि/३८९, दि. १४/७/२००८ चे पत्र.

## मा. सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १७५**

संदर्भ :– मा. दत्तात्रय खाडे, मा. प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, मा. उज्वल केसकर, मा. अशोक येनपुरे व मा. अविनाश साळवे यांची (सुचना दिनांक १८/३/२००८).

–––

वॉर्ड क्र. ३५ (मॉडर्न कॉलेज) मध्ये बांधण्यात आलेले पंडित रवी वर्मा कलादालनाचे उद्घाटन मा. गोपीनाथ मुंडे, राष्ट्रीय सरचिटणीस, भाजपा यांच्या शुभहस्ते करण्यात यावे. कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

**विषय क्र. १७६**

संदर्भ :– मा. बापूराव कर्णे गुरुजी व मा. दिलिप बराटे यांची (सुचना दिनांक १/४/२००८).

–––

कै. बाबू जगजीवनराव विद्यालयाच्या २७ खोल्यांची (मराठी माध्यमाच्या १८ खोल्या व इंग्रजी माध्यमाच्या ९ खोल्या) इमारत पूर्णत: नव्याने बांधकाम झाले आहे. या इमारतीचे उद्घाटन मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदा व पालक मंत्री, पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते व मा. राजलक्ष्मीताई भोसले, महापौर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सर्व पक्षनेत्यांच्या उपस्थितीत पुणे मनपाचे वतीने करण्यात यावे.

सदर समारंभाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात येत आहे.

**विषय क्र. १७७**

संदर्भ :– मा. बापूराव कर्णे गुरुजी व मा. सिध्दार्थ धेंडे यांची (सुचना दिनांक २/४/२००८).

–––

त्रिदलनगर महाराष्ट्र हौसिंग बोर्ड. शांतिरक्षक सोसायट्यांना अत्यंत अपूरा पाणी पुरवठा होतो म्हणून शहर सुधारणा समिती मध्ये मा. महापालिका आयुक्तांचा सकारात्मक अभिप्राय घेऊन महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथे

UnRegistered

१० लाख लिटरचे पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यासाठी १ कोटी ७० लाख रुपये खर्च येणार आहे. या कामासाठी सन २००७–२००८ चे बजेट मधुन ४२ लाखाचे वर्गीकरण केले आहे. तसेच सन २००८ – २००९ चे बजेट मध्ये रु. ४७.५० लाखाची तरतूद केली असून सर्व्हीस लाईनसाठी रु. ४५ लाखाची तरतूद केली आहे. तरी या कामाचा भूमीपूजन समारंभ मा. ना. अजितदादा पवार यांचे शुभहस्ते व मा. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सर्व पक्षनेत्यांच्या उपस्थितीत पुणे मनपाचे तर्फे करण्यात यावा.

सदर समारंभाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात येत आहे.

**विषय क्र. १७८**

संदर्भ :– मा. सुभाष जगताप व मा. प्रसन्न जगताप यांची (सुचना दिनांक ११/४/२००८).

–––

पुणे महानगरपालिका वॉर्ड क्र. १२६, तळजाई मंदिर पर्वती, स. नं. ६७ ते ७३ येथील वन उद्यान व महाराष्ट्र शासनाच्या पर्वती पाचगाव वन विभागातील विविध विकास कामांचा शुभारंभ मा. ना. शरद पवार, केंद्रीय कृषिमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते व मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदामंत्री व पालकमंत्री, पुणे जिल्हा, मा. ना. बबनराव पाचपुते, वनमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. सुरेश कलमाडी, खासदार, मा. उल्हास पवार आमदार व अध्यक्ष उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ, मा. रमेश बागवे, आमदार, मा. मोहन जोशी, आमदार व मनपाचे सर्व पदाधिकारी व मा. पक्षनेते, स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत व मा. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली पुणे मनपाचे तर्फे रविवार दि. १३ जुलै २००८ रोजी वाजता करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र. १७९**

संदर्भ :– मा. आबा बागुल यांचे दि. २/५/२००८ व मा. अविनाश साळवे, मा. सौ. विद्या भोकरे, मा. श्रीमती लता राजगुरु व मा. चेतन तुपे यांची (सुचना दिनांक १७/७/२००८).

–––

आदरणीय भाई वैद्य ज्येष्ठ समाजसेवक ह्यांना वयाची ८० वर्षे पूर्ण होत असून पुणे महानगरपालिकेच्या वतीने मानपत्र देवून गौरविण्यात यावे.

ज्येष्ठ समाजवादी नेते माजी गृहराज्य मंत्री पुण्याचे माजी महापौर, भाई वैद्य यांच्या वयाला नुकतेच ८० वर्ष पूर्ण झाले आहेत.

आदरणीय भाई वैद्य यांचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्राला सर्वज्ञात आहे. तरी अशा आदर्श नेते मा. भाई वैद्य यांचा पुणे महानगरपालिकेच्या वतीने मानपत्र देवून सत्कार करावा.

**विषय क्र. १८०**

संदर्भ :– मा.अरविंद शिंदे, मा. ॲड. निलेश निकम व मा. विरेंद्र किराड यांची (सुचना दिनांक ५/६/२००८).

–––

श्रीमती शैला दिघे मावशी ह्या अध्यात्मातून प्रबोधन गेली अनेक वर्षे करीत आहेत. कुठल्याही अंधश्रध्देला प्रोत्साहन न देता ते हे प्रबोधनाचे काम करीत आहेत. अनेकांना संकट काळात त्यांनी मार्गदर्शन करुन अडचणी दूर केल्या आहेत. त्यांचेकडे केवळ पुणे शहरातूनच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक शहरातून लोक येत असतात. काउसिलिंगचे त्या काम करीत असतात. कुठलाही आर्थिक व्यवहार त्यांचेकडे होत नसतो. समाजातील अपप्रवृत्ती, अनिष्ठ चाली, रुढी नष्ट करण्याचे ते काम करीत असतात.

तरी पुणे महानगरपालिकेतर्फे त्यांचा खास सत्कार करण्यात यावा.

**विषय क्र. १८१**

संदर्भ :– मा.सौ. सीमा सरदेशपांडे व मा. शिवराम मेंगडे यांची (सुचना दिनांक १९/६/२००८).

–––

पुणे महानगरपालिकेतर्फे वॉर्ड क्र. ३४ मॉडेल कॉलनी येथील चित्तरंजन वाटिकेत बांधलेल्या जिव्हाळा केंद्राचा उद्घाटन समारंभ मा. सौ. सुषमा स्वराज, माजी केंद्रीय मंत्री व खासदार यांच्या शुभहस्ते व मा. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली व मा. प्रकाश जावडेकर, खासदार, मा. सुरेश कलमाडी, खासदार, मा. विनायक निम्हण, आमदार, तसेच मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, पुणे, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. अनिल भोसले, सभागृह नेते, मा. प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, मा. उल्हास उर्फ आबा बागुल, पक्षनेते, कॉंग्रेस, मा. रविंद्र धंगेकर, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा. महेश लडकत, अध्यक्ष, शिक्षण मंडळ, मा. दिपक उर्फ बाळासाहेब बोडके, अध्यक्ष घोलेरोड प्रभाग समिती,

UnRegistered

मा. सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे स्थानिक नगरसेविका यांच्या उपस्थितीत पुणे मनपाचे तर्फे मंगळवार दि.२४ जून २००८ रोजी करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र. १८२**

संदर्भ :– मा.सागर माळकर व मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती यांची (सुचना दि.१९/६/२००८).

–––

वॉर्ड क्र. ६ एअर पोर्ट ते नगर रोड या व्ही आय पी रोडचे उद्घाटन मा. शिवसेना कार्यकारी अध्यक्ष, मा. उध्दवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते व पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मा. शिवसेना संपर्क प्रमुख आमदार अरविंदभाई सावंत, मा. खा. शिवाजीराव आढळराव पाटील, मा. सुरेशभाई कलमाडी स्थानिक खासदार व मा. आमदार चंद्रकांतजी छाजेड उद्योगपती बाबासाहेब कल्याणी यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच पुणे मनपातील सर्व पक्षनेते व स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत करण्यात यावा.

सदर समारंभाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात येत आहे.

**विषय क्र. १८३**

संदर्भ :– मा.प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा. अजित आपटे यांची (सुचना दिनांक २१/७/२००८).

–––

डॉ. राजेंद्र पचौरी यांच्या आय.पी.सी.सी. या संघटनेस पर्यावरणातील बदल या विषयाच्या कार्याबद्दल नोबेल पारितोषिक देण्यात आले आहे. हा नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या टीममध्ये डॉ. राजेंद्र शेंडे या पुण्याच्या वैज्ञानिकाचा देखील समावेश आहे. त्यांच्यासह डॉ. पचौरी यांनी हा नोबेल पुरस्कार स्विकारला आहे. पर्यावरण बदल या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेले त्यांचे संशोधन कार्य विविध विद्यापीठांनी मान्य केले आहे. तसेच अमेरिका सरकारने त्यांना पर्यावरण विषयक पुरस्कार देवून गौरविले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या ओझोन विषयक कृती समितीचे ते अध्यक्ष आहेत.

डॉ. राजेंद्र शेंडे या कर्तृत्ववान संशोधकाचा नोबेल विजेत्या टीमचा सदस्य म्हणून व मुलत: पुणेकर असणाऱ्या या भारतीयाचा पुणे मनपाव्दारा विशेष सत्कार करुन गौरव करण्यात यावा. स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुणेरी पगडी देवून खास सत्कार करण्यात यावा. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून भारताचे माजी राष्ट्रपती व थोर वैज्ञानिक डॉ. अब्दुल कलाम यांना आमंत्रित करावे.

**विषय क्र. १८४**

संदर्भ :– मा. विरेंद्र किराड, मा. अनिल भोसले, सभागृह नेते, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, व मा. रविंद्र धंगेकर यांची (सुचना दि.२८/७/२००८).

–––

मा. बिपिनचंद्र उर्फ कृष्णनाथ विठ्ठल मेणकर, वय ८२ हे पुणे शहराचे जेष्ठ नागरिक असून लिंगायत सेवा मंडळाचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्षापासून विधायक सामाजिक कार्य करीत आहे. तसेच विरशैव समाजाचे तहायत सदस्य व पुणे शहरातील प्रसिध्द देवस्थान विठ्ठल मंदिर देवस्थान कस्तुरे चौक चे २५ वर्षे विश्वस्त म्हणून कार्यरत आहे. त्यांनी पुणे शहराचे लौकीकामध्ये भर घातली आहे. तरी त्यांचा पुणे मनपाचे वतीने खास सत्कार करण्यात यावा.

**विषय क्र. १८५**

संदर्भ :– मा. पृथ्वीराज सुतार, मा. मुरलीधर मोहोळ व मा. राजेंद्र गोरडे यांची (सुचना दि. २५/७/२००८).

–––

पुणे मनपात महत्वाच्या पदावर महाराष्ट्र शासनाकडील अधिकारी प्रतिनियुक्तीने पाठविले जातात व सदर अधिकाऱ्यांची नेमणूक करुन त्यांचे नेमणूकीचे विषयपत्र माहितीसाठी मुख्य सभेपुढे ठेवेले जाते. तसेच पुणे मनपातील महत्वाच्या पदावर शासनाकडील अधिकारी आल्यामुळे मनपातील अधिकाऱ्यांच्या बढतीच्या संधी फारच कमी होतात. त्यामुळे त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय करण्यासारखे आहे. त्यामुळे मनपातील अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होत आहे.

तरी येथून पुढे मनपातील रिक्त होणाऱ्या महत्वाच्या पदावर मनपातील अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात याव्यात.

Unregistered

<u>विषय क्र. १८६</u>

संदर्भ :- मा. ॲड. किशोर शिंदे व मा. राजेंद्र वागसकर यांची (सुचना दिनांक १४/३/२००८).

---

पुणे शहरातील सध्या रस्त्यात व चौकात वाहतुकीच्या दृष्टीने अडथळा होत असलेले पुतळे योग्य ठिकाणी सन्मानपूर्वक हलविणेत यावेत. तसेच यापुढे नविन पुतळे स्विकारताना मे. राज्य शासनाच्या निकषानुसार स्विकारणेत यावेत.

(टिप :- विषय क्र. १७५ ते १८६ हे दि.२८/७/२००८ च्या पक्षनेते सभेमध्ये फेरफारासह मान्य झाले आहेत.)

## संकिर्ण

<u>विषय क्र. १८७</u>

अपघात झाल्यामुळे माहे जून २००८ ते माहे ऑगस्ट २००८ दरम्यान भरणाऱ्या पुणे मनपाच्या मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सदर कालावधीची रजा मान्य करणेबाबत मा. माधुरी मिसाळ यांचे दिनांक २१/७/२००८ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :- ८/८/२००८.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– १३/८/२००८

**पुणे महानगरपालिका –सुचना कार्यपत्रिका क्रं. ६ (पुरवणी)**
**ऑगस्ट २००८**

**सोमवार दि. १८ ऑगस्ट २००८ या दिवशी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आली आहे.**

**:– मा.सभासदांचा प्रस्ताव –:**

**विषय क्रं. १८८**

संदर्भ :– **मा. नितिन जगताप व मा. सौ. कमल व्यवहारे यांची सुचना दि. ७/८/२००८.**
१) मा. नगरशासक यांचे पत्र क्र. नशा.आरोग्य,८८०, दि. २१/११/६७.
२) वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती ठराव क्र. ९७, दि. ५/१२/६७.
३) स्थायी समिती ठराव क्र. ९४५,दि. ९/१२/६७.

----

सध्या महानगरपालिकेच्या सेवकांना वैद्यकीय सहाय्य म्हणून महानगरपालिकेच्या वेल्फेअर फंडातून (कल्याणनिधी) आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी रु. १५,०००/– ची तरतूद करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेतील सेवकांची संख्या व उपलब्ध रक्कम लक्षात घेता रक्कम अपूरी पडते.

सध्या महानगरपालिकेच्या सेवकांना वैद्यकीय सहाय्य देण्याचे आजच्यापेक्षा अधिक उदार व कल्याणकारी धोरण ठरविणे अगत्याचे आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर असलेली कॉन्ट्रीब्युटरी हेल्थ सर्व्हिस स्कीम महानगरपालिकेच्या सेवकांना लागू करण्यात यावी.

सबब मा. नगरशासक यांनी त्यांच्या संदर्भांकित पत्रात सुचविलेली कॉन्ट्रीब्युटरी हेल्थ सर्व्हिस स्कीम ही विधायक स्वरुपाची योजना मान्य करण्यात येत आहे व ती दि. १५/२/१९६८ पासून म्हणजे महानगरपालिकेच्या वर्धापन दिनापासून अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ही योजना मा. सभासदांनाही लागू करण्यात यावी व त्यांच्याकडून मासिक रु. २ वर्गणी घ्यावी व ती मानधनातून कापून घेण्यात यावी.

वरील मुख्य सभा ठराव क्र. ३००, दि. १९/१२/६७ चा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा. नगरशासक यांचे पत्र क्र. नशा.आरोग्य,८८०, दि. २१/११/६७.
२) वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती ठराव क्र. ९७, दि. ५/१२/६७.
३) स्थायी समिती ठराव क्र. ९४५,दि. ९/१२/६७.
४) मुख्य सभा ठराव क्र. ३००, दि. १९/१२/६७.

----

पुणे महानगरपालिका अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना नियम १९६८ ही योजना मनपा मुख्यसभा ठराव क्र. ३००, दि. १९/१२/१९६७ अन्वये मान्य करण्यात आली आहे. त्यातील अ.क्र. ३ मध्ये कुटुंब या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. सदर व्याख्येमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करावी.

कुटुंब :– कुटुंब म्हणजे सभासदाची पत्नी अथवा पती, आई–वडील व त्यांचेवर अवलंबून असलेली मुले व सभासदांच्या सुना.

येणेप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. १३/८/२००८**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टिप :– .प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

Unregistered

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१४/८/२००८

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये सोमवार दि. १८/८/२००८ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या माहे ऑगस्ट २००८ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यांसाठी आलेले विषय.**

**विषय क्रं. १**

संदर्भ :– १) मा.दिलिप बराटे व मा.दत्ता धनकवडे यांचे दि. १८/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६६८, दि. १२/८/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वारजे–रामनगर येथील कै.वनोबा बाळोबा बराटे शाळेची इमारत बांधणेकरीता र.रुपये १७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे, (यादी क्र. ए–२), पान क्र. २४७, अ.क्र. १७८, वॉर्ड क्र. १११ वारजे गावठाण रस्त्यालगत सर्व्हिस रस्त्यावरील नाल्यावरील कल्व्हर्टचे काम करणे | १७ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| वारजे–रामनगर येथील कै.वनोबा बाळोबा बराटे शाळेची इमारत बांधणे | ––– | १७ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. २**

संदर्भ :– १) मा.विकास दांगट व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २१/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६७१, दि. १२/८/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १३० शंकर दांगट यांचे घर ते धबाडी परिसर ग्राऊट करणे र.रुपये ३ लाख तसेच वॉर्ड क्र. १३० मधील विश्वास रेसिडेन्सी रस्ता ग्राऊट करणे र.रुपये २ लाख असे एकूण र.रुपये ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १५०, अ.क्र. ४५, शहरात विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे, (यादी क्र. एस–८), पान क्र. २६१, अ.क्र. ९३, वॉर्ड क्र. १३० श्री.कांबळे सर (साहेबराव मोरे) यांच्या घरापासून ते श्री.बळीराम शेळके यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | ५ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. १३० शंकर दांगट यांचे घर ते धबाडी परिसर ग्राऊट करणे | ––– | ३ लाख |
| २) वॉर्ड क्र. १३० मधील विश्वास रेसिडेन्सी रस्ता ग्राऊट करणे | ––– | २ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ३**

संदर्भ :– १) मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २३/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६७२, दि. १२/८/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

UnRegistered

वॉर्ड क्र. ९३ हडपसर साधना विद्यालय येथे विविध ठिकाणी भुमिगत केबल टाकणेसाठी र.रुपये २५.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी ए–२), पान क्र. २४७, अ.क्र. १४९, हडपसर क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत विविध रस्त्यांवर पावसाळी लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | २५.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ९३ हडपसर साधना विद्यालय येथे विविध ठिकाणी भुमिगत केबल टाकणे | --- | २५.५० लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ४**

संदर्भ :– १) मा.सौ.सुनिता चिंतल व मा.सौ.कमल व्यवहारे यांचे दि. २३/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६७४, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १३८ महेश सोसायटी येथे पावसाळी लाईन टाकणेकरीता र.रुपये ३ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, पान क्र. सीपीटीएल–५३, वॉर्ड क्र. १३८ महेश सोसायटी कॉर्नर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १३८ महेश सोसायटी येथे पावसाळी लाईन टाकणे | --- | ३ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ५**

संदर्भ :– १) मुले जा.क्र. ६६७ दिनांक ३०.४.०८ अन्वये मिळालेली मान्यता.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/४०२ दि. १५/७/२००८ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. ७१२, दि. १२/८/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सन २००७–०८ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या मुदतवाढीना आवश्यक असलेल्या मर्यादेबाबत व रिन्यूड ग्रॅन्ट/वर्गीकरणाव्दारे तरतूद उपलब्ध करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष शिल्लक रकमेच्या अनुषंगाने आर्थिकदृष्ट्या योग्य असलेली रक्कम रू. ११३ कोटीची आर.जी. सन २००८–२००९ मध्ये पुढे ओढण्यास व त्यानुसार सन ०७–०८ मध्ये खात्यांकडून कार्यादेश दिलेल्या कामांची यादी प्राप्त करून घेणेस व सन २००७–०८ मध्ये कार्यादेश दिलेले तथापि सदर कामासाठी सन २००७–०८ मध्ये मान्य वर्गीकरण प्रस्ताव निधिची उपलब्धता जादा बाबी,दीडपट काम करण्यासाठी मान्यता इत्यादि मुळे अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध नाही. अशा अतिरिक्त लागणा–या रक्कम रू. १११.२० कोटीसाठी सन २००८–२००९ मधील खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे भांडवली कामांतून १७% कपात करून सदरची रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेस

१७% कपातीचा तक्ता

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|

UnRegistered

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १. | मुख्यसभेने अंदाजपत्रकात भांडवली कामासाठी केलेली तरतूद | | १३२८,३८,५०,०००/- |
| वजा | २. | जे एन एन यु आर एम अनुदान | ३००,००,००,०००/- | |
| | ३. | सार्वजनिक वाहतूक विशेष प्रकल्प | १२५,००,००,०००/- | |
| | ४. | आमदार खासदार निधी | ७,००,००,०००/- | |
| | ५. | मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी | १७,५९,२५,०००/- | |
| | ६. | महिला बालकल्याण | १३,९४,७५,०००/- | |
| | ७. | युवक कल्याणकारी योजना | ४,३०,००,०००/- | |
| | ८. | वृक्षसंवर्धन निधीला देणगी | ३,३०,००,०००/- | |
| | ९. | शहरातील नवीन रस्ते करणे व रस्ते डांबरीकरण करणे (रक्कम रू. २५ लाख व त्यापेक्षा कमी रकमेची तरतूद असलेली पथ विभाग व क्षेत्रिय कार्यालयाकडील सर्व कामे) | १३७,११,८२,०००/- | |
| | १०. | पाणीपुरवठा प्रकल्प टप्पा क्र. १ | ४१,५०,००,०००/- | |
| | ११. | मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा क्र. १ | २४,५०,००,०००/- | |
| | | | | ६७४,२५,८२,०००/- |
| | | | ------------ | ६५४,१२,६८,०००/- |
| | | | सरसकट कपात १७ % नजीकच्या पूर्णांकात रू. १११,२०,००,००००/- | |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्र. ६**

संदर्भ :- १) मा.संदिप लडकत व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. २९/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७२३, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समिती झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ७६ मध्ये विविध कामे करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, ४.४वनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र. १, निरनिराळ्या मलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-४), पान क्र. ३०१, अ.क्र. १८, वॉर्ड क्र. ७६ काशेवाडी झोपडपट्टी व आण्णाभाऊ साठे वसाहतमध्ये ग.व.नि.अंतर्गत विविध विकास कामे करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ७६ मधील बालाजी मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ७६ घरांक ८२४, ८२७, ८३० भवानी पेठ याठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ३) वॉर्ड क्र. ७६ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, काँक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ४) वॉर्ड क्र. ७६ काशिवाडी म्हसोबा मंदिर ते भगवा चौक परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| ५) वॉर्ड क्र. ७६ मधील भगवा चौक ते लडकत मळा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे | --- | १० लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्र. ७**

संदर्भ :- १) मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. २९/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७२४, दि. १२/८/२००८.

UnRegistered

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रतिनियुक्तीवर कोणत्याही पदावर येणाऱ्या अधिकारी यांना मुख्य सभेचे पुर्व मान्यताशिवाय रुजु करुन न घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ८**

संदर्भ :– १) मा.सुनिल गोगले यांचे दि. ३१/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ७२७, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १६ फुलेनगर येथील रस्त्यास अडथळा ठरणारे विद्युत पोल रस्त्याच्या कडेला हलविण्यासाठी र.रुपये १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १७०, अ.क्र. २१, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एस–११), पान क्र. २७८, अ.क्र. १५, स.नं. ९० आदर्श इंदिरानगर येथे प्रकाश व्यवस्था करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १६ फुलेनगर येथील रस्त्यास अडथळा ठरणारे विद्युत पोल रस्त्याच्या कडेला हलविणे | --- | १५ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ९**

संदर्भ :– १) मा.बाळासाहेब कापरे व मा.सौ.उषाताई जाधव यांचे दि. ३१/७/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ७२८, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १२८ पुणे मर्चंट बँक सद्गुरु सोसायटी ते नंदादिप सोसायटीपर्यंत ६ इंची पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रुपये ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, अ य क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. ४८, वॉर्ड क्र. १२८ मधुकर हॉस्पिटलचे पाठीमागील नाल्यावर विविध सुधारणा कामे करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १२८ पुणे मर्चंट बँक सदगुरु सोसायटी ते नंदादिप सोसायटीपर्यंत ६ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | ५ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १०**

संदर्भ :– १) मा.सौ.राजश्री आंदेकर यांचे दि. १/८/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ७२९, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ७७ मध्ये विविध ठिकाणी फरशी व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र. ५, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र. एस–१९), पान क्र. ३०४, अ.क्र. २५, वॉर्ड क्र. ७७, घरांक १११६ नाना पेठ कैकाडे गल्ली सुलभ | | |

UnRegistered

| | कमी | अधिक |
|---|---|---|
| शौचालय बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ७७ मध्ये विविध ठिकाणी फरशी व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. ११**

संदर्भ :- १) मा.सौ.रेखा टिंगरे व मा.सुनिल गोगले यांचे दि. १/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७३०, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये राहणारे माजी सैनिक की ज्यांनी स्वत:च्या जीवावर उदार होऊन देशाचे संरक्षण केले आहे असे नागरिक पुणे मनपाच्या हद्दीमध्ये घर घेऊन राहिलेले आहेत. तरी अशा नागरिकांना मिळकत करामध्ये १००% सुट देण्यात यावी.

तसेच विधवा माता भगिनी यांना मिळकत करामध्ये सर्वसाधारण सुट देण्यात यावी तसेच पुणे शहराच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मिळकत करामध्ये ५% सुट देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १२**

संदर्भ :- १) मा.सौ.नंदा कांबळे व मा.शंकर केमसे यांचे दि. २/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७७०, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ५ भारतनगर, शांतीनगर व जाधवनगर या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र. १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-४), पान क्र. ३००, अ.क्र. ३, वॉर्ड क्र. ५ राजीव गांधीनगर झोपडपट्टीत आळंदीरोड येथे विविध विकास कामे करण | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ५ भारतनगर, शांतीनगर व जाधवनगर या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १३**

संदर्भ :- १) मा.भिमराव खरात व मा.बापुसाहेब पठारे यांचे दि. ५/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७७९, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ७ मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६४, अ.क्र. २५१, चालू कामांसाठी जादा लागणारी तरतूद (यादी ए-३), पान क्र. २५३, अ.क्र. १८, वॉर्ड क्र. ७ येरवडा (विमाननगर) येथील लुंकड कॉलनी सोसायटीजवळ म्हाडा कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आर.सी.सी.पावसाळी गटार करणे | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ७ मध्ये खुळेवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २० लाख |
| २) वॉर्ड क्र. ७ मध्ये गुरुद्वारा, संतनगर, राजीव गांधीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २० लाख |

Unregistered

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १४**

संदर्भ :– १) मा.विरेंद्र किराड यांचे दि. ५/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७८२, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ७८ मधील श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यान येथे सांस्कृतिक हॉल (सभा मंडप) चे वाढीव व शिल्लक काम करणेकरीता र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२३), पान क्र. २८७, अ.क्र. १९, वॉर्ड क्र. ७८ मौलाना महंमद अली जोहर उर्दु माध्यमिक विद्या निकेतन रविवार पेठ येथे हॉल बांधणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ७८ मधील श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यान येथे सांस्कृतिक हॉल (सभा मंडप) चे वाढीव व शिल्लक काम करणे | --- | २० लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १५**

संदर्भ :– १) मा.सौ.नंदा कांबळे व मा.सौ.विद्या भोकरे यांचे दि. ६/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७८३, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ५ शांतीनगर येथे सांस्कृतिक हॉल बांधणेसाठी र.रुपये १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२३), पान क्र. २८७, अ.क्र. २, प्रभाग क्र. ५ मध्ये बालवाडी बांधणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ५ शांतीनगर येथे सांस्कृतिक हॉल बांधणे | --- | १५ लाख |

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १६**

संदर्भ :– १) मा.बापुसाहेब पठारे व मा.सौ.सुमन पठारे यांचे दि. ७/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७८४, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ८ मध्ये चंदननगर शाळा क्र. १५८ येथे जुन्या वर्गखोल्या पाडून नव्याने वर्गखोल्या बांधींसाठी र.रुपये ४५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२३), पान क्र. २७८, अ.क्र. ३९, आपले घर तुळजाभवानी नगर येथील ॲमिनीटीजवर स्पेसवर शाळा बांधणे | २५ लाख | --- |
| अ.क्र. ४२ स.नं. ६१, बोराटे वस्ती परिसरात शाळा बांधणे | २० लाख | --- |

नविन सुचविलेले काम

Unregistered

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र. ८ मध्ये चंदननगर शाळा क्र. १५८ येथे जुन्या वर्गखोल्या पाडून नव्याने वर्गखोल्या बांधणे | --- | ४५ लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १७**

संदर्भ :- १) मा.दिलिप उंबरकर व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १२/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८१०, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ५९ स.नं. १११/११२ सुतारदरा येथे कॉंक्रीटीकरण करणे तसेच स.नं. १११/११२ सुतारदरा येथे ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. १४६, अ.क्र. ३०, शहरात दवाखाने व रुग्णालयामध्ये विकासाची कामे करणे, (यादी एस-२५), पान क्र. २८९, अ.क्र. ४, वॉर्ड क्र. ५९ सुतारदरा १११/११२ येथे मनपाचा दवाखाना बांधणे | २० लाख | --- |

नविन सुचविलेले काम

| | | |
|---|---|---|
| १) वॉर्ड क्र. ५९ स.नं. १११/११२ सुतारदरा येथे कॉंक्रीटीकरण करणे | --- | १५ लाख |
| २) वॉर्ड क्र. ५९ स.नं. १११/११२ सुतारदरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ५ लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १८**

संदर्भ :- १) मा.वसंत मोरे व मा.संदिप लडकत यांचे दि. १२/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८११, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १४१ अंबामाता मंदिरामागील सम्राट हाईटस येथील रस्ते ग्राऊट व पेव्हर करणेसाठी र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. २०६, अ.क्र. १७, शहरात विविध भाजी मंड्यांमध्ये विकास कामे करणे, (यादी एस-२९), पान क्र. २९६, अ.क्र. १५, वॉर्ड क्र. १४१ कात्रजगांव येथे मनपाच्या जागेवरील पी.एम.टी.बस स्टॉप येथे भाजी मंड्या विकसित करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १४१ अंबामाता मंदिरामागील सम्राट हाईटस येथील रस्ते ग्राऊट व पेव्हर करणे | --- | १५ लाख |

(टिप :- सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. १९**

संदर्भ :- १) मा.महानगरपालिका सभा क्र. १७४ दि. २३/१०/२००७ व महाराष्ट्र शासन राजपत्र माहे दि. ६ मार्च २००८ तील भाग क्र. १०
२) मा.सभासद श्री.पृथ्वीराज सुतार, वॉर्ड क्र. ६४ यांचे दि. १०/३/२००८ रोजीचे पत्र.
३) मा.सभासद श्री.अंकुश दगडु तिडके, वॉर्ड क्र. ६० यांचे पत्र.
४) मुख्य उद्यान अधिक्षक यांचेकडील पत्र जा.क्र. उका/६८१५ दि. ११/३/२००८
५) मुख्य उद्यान अधिक्षक यांचेकडील पत्र जा.क्र. उका/६८१७ दि. ११/३/२००८
६) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(क्र.१)/५३७ दि. १२/८/२००८ चे पत्र.
७) मा.दिलिप उंबरकर व मा.अशोक येनपुरे यांची दि. १२/८/२००८ ची उपसूचना
८) स्थायी समिती ठराव क्र. ८१४, दि. १२/८/२००८.

---

Unregistered

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ६४, कै.तात्यासाहेब थोरात उद्यान, कोथरुड सर्व्हे नं. १४३, १४४ येथील अव्यवसायिक/समाज उपयोगी संस्थांना व्यवस्थापन व चालविणेस देणेसाठी जाहिरात देवून सेवाभावी संस्थांकडून प्रस्ताव मागविले असता आलेल्या तीन प्रस्तावांपैकी नियम व अटीत नमूद केल्याप्रमाणे राजा श्री शिवराय प्रतिष्ठान या संस्थेने ५ वर्षाचा ऑडीट रिपोर्ट, सामाजिक कार्याचा अहवाल वृत्तांत दिला आहे. इतर दोन संस्थांनी या अटी पूर्ण केलेल्या नाहीत.

सबब प्रस्तुत प्रकरणी राजा श्री शिवराय प्रतिष्ठान यांना कै.तात्यासाहेब थोरात उद्यान येथील अभ्यासिका व विरंगुळा केंद्र खालील नियम व अटींनुसार विनामोबदला सन २००८–०९ पासून पुढील पाच वर्षांकरीता चालविण्यास देणेस तसेच वरील संस्थेचे काम समाधानकारक वाटल्यास पुढील प्रत्येक मुदत वाढविण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

नियम व अटी

१) धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेली संस्था
२) मागील दहा वर्षापासूनचा सामाजिक कार्याचा अहवाल
३) पाच वर्षाचा ऑडीट रिपोर्ट
४) १ लाख रुपयांची बँक गॅरेंटी
५) अभ्यासिका, ग्रंथालये, सार्वजनिक वाचनालये चालविण्याचा अनुभव
६) संस्थेचा कार्यकारणी मंडळाच्या ठरावाची प्रत
७) मिळकतीची किरकोळ देखभाल, दैनंदिन स्वच्छतेची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.
८) पात्र संस्थेस पुणे महानगरपालिकेशी विधी सल्लागार यांचे सुचनेनुसार आवश्यक तो करारनामा करुन द्यावा लागेल.

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**विषय क्रं. २०**

संदर्भ :– १) मा.विरेंद्र किराड, मा.अशोक येनपुरे, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १२/८/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८१७, दि. १२/८/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

भारताला बिजिंग ऑलंपिक स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळवून देणाऱ्या भारताचा सुपूत्र अभिनव बिंद्रा ह्याला पुणे मनपाने १० लाख रुपये देण्यात यावेत आणि पुणे शहरात अशा प्रकारची केवळ एकमेव शुटींग रेंज महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे वतीने चालविण्यात येते त्या संस्थेला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ५ लाख रुपये देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००८ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

Unregistered